सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ८ जुलै २०२६

आतील पानावर

पान २– सनी देओल पुन्हा वकिलाच्या भूमिकेत
पान ३– जान्हवीने दिली प्रेमाची हटके कबुली?
पान ४– 'टॉक्सिक'मध्ये दिसली पाच अभिनेत्रींची झलक
पान ५– लांजेकरांचे सातवे पुष्प 'दर्याभवानी'
पान ७– मराठी रंगभूमीची 'बाई'!



# 'चांदनी बार २'मध्ये कॅटरिना



कॅटरिना कैफ दीर्घकाळापासून मोठ्या पडद्यावर दिसून आलेली नाही. अशास्थितीत अभिनेत्री एका सीकेलसाठी बोलणी करत आहे. या चित्रपटात अभिनेत्री तब्बू देखील मुख्य भूमिकेत असू शकते. कॅटरिना कैफ सीक्वेल चित्रपटाद्वारे मोठ्या पडद्यावर परतण्यास तयार असल्याचे समजते.

निर्मात्यांनी या प्रोजेक्टविषयी अधिक माहिती देणे टाळले आहे. तर कॅटरिना या प्रोजेक्टमध्ये सामील असल्याचे कळताच तिच्या चाहत्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे. कॅटरिना २००१ मध्ये प्रदर्शित चित्रपट 'चांदनी बार'चा सीक्वेल 'चांदनी बार २'साठी तयारी करत आहे. या सीक्वेलचे दिग्दर्शन अजय बहल करणार असून सध्या याच्या कलाकारांची निवड करण्याची प्रक्रिया सुरू आहे. चांदनी बार या चित्रपटाचे दिग्दर्शन मधुर भंडारकर यांनी पेले होते. या क्राइम ड्रामामध्ये मुंबईच्या अंडरवर्ल्डचे जग दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. यात तब्बूने एका डान्सरची भूमिका साकारली होती. कॅटरिना यापूर्वी सूर्यवंशी, फोन भूत, टायगर ३ आणि मेरी क्रिसमस या चित्रपटांमध्ये दिसून आली होती. अभिनयासोबत तिने स्वत:चा ब्यूटीब्रँड वाढविण्यावरही लक्ष केंद्रीत केले आहे.






# सुपरहिट जोडी १८ वर्षानंतर पुन्हा एकत्र!

अक्षय कुमार आणि सैफ अली खान यांची लोकप्रिय जोडी पुन्हा मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. 'भूत बंगला' या चित्रपटाच्या यशानंतर दिग्दर्शक प्रियदर्शन आणखी एक चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. त्यांच्या आगामी सस्पेन्स-क्राइम थ्रिलर चित्रपटाबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. या चित्रपटाचे नाव हैवान असून गेल्या अनेक दिवसांपासून चित्रपटाविषयी अपडेट समोर येत आहेत. आता या चित्रपटाची रिलीज डेट समोर आली आहे. त्यामुळे चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. अक्षय कुमार आणि सैफ अली खान या चित्रपटात एकत्र स्क्रिन शेअर करताना दिसणार आहेत. निर्मिती संस्था केव्हीएन प्रॉडक्शन्सने इंस्टाग्राम पोस्टद्वारे हैवान चित्रपटाच्या रिलीज डेटची घोषणा केली. इंस्टाग्रामवर एक वेड एक अखंड प्रयत्न आणि एक तारीख जी तुम्ही कधीच विसरणार नाही. प्रियदर्शन यांचा 'हैवान' ११ सप्टेंबरला प्रदर्शित होत आहे. असे म्हटले आहे. या पोस्टवर चाहत्यांनी कमेंट्स करत आनंद व्यक्त केला. अनेकांनी अक्षय कुमारच्या आणखी एका दमदार चित्रपटाची उत्सुकता व्यक्त केली, तर काहींनी सैफ अली खानच्या मुख्य भूमिकेतील पुनरागमनाचे स्वागत केले. अनेक चाहत्यांनी या जोडीला ब्लॉकबस्टर कॉम्बिनेशन असेही संबोधले आहे. नव्वदच्या दशकात अक्षय कुमार आणि सैफ अली खान या लोकप्रिय जोडीने अनेक चित्रपटांमध्ये एकत्रित काम केले आहे. त्यापैकी 'मैं खिलाडी तू अनारी', 'तू चोर मैं सिपाही', 'आरजू' आणि 'तशन' यांसारख्या चित्रपटांमध्ये या जोडीला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले. आता तब्बल १८ वर्षानंतर ही जोडी पुन्हा एकदा हैवान चित्रपटाच्या माध्यमातून एकत्रित दिसत असल्याने चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

# संजय दत्तने का सोडला 'तो' चित्रपट?



हिंदी सिनेसृष्टीत सध्या अक्षय कुमारच्या 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटाची जोरदार चर्चा आहे. हा चित्रपट चर्चेत असण्याचं दुसरं कारण म्हणजे यातील स्टारकास्ट. जवळपास तीसहून अधिक कलाकार या चित्रपटात झळकळे आहेत. यापैकी काही असे कलाकार सुद्धा आहेत ज्यांची नावं चित्रपटाची घोषणा झाल्यानंतर समोर आली होती. मात्र, प्रत्यक्षात चित्रपटातून हे कलाकार गायब असल्याचं पाहायला मिळालं. यामध्ये संजय दत्त, शरीब हाश्मी, राहुल देव आणि गायक मिका सिंग या कलाकारांचा समावेश आहे. त्यात आता दिग्दर्शक अहमद खान यांनी या सगळ्या चर्चांवर मौन सोडलं असून, संजय दत्तने चित्रपट सोडण्यामागील कारणही सांगितलं आहे. ते म्हणाले, संजू बाबाला स्क्रिप्ट खूप आवडली होती आणि त्याला या चित्रपटाचा भाग होण्याची खूप इच्छा होती. अक्षय कुमार आणि जॅकी श्रॉफ यांसारखे त्यांचे अत्यंत जवळचे मित्र या प्रोजेक्टमध्ये आहेत. हे ऐकून तो खूप उत्साही होता. मग पुढे ते म्हणाले, आम्ही त्याच्यासोबत चित्रपटातील काही सीन्स देखील शूट केले होते. मात्र, त्याला तारखांची अडचण येत होती. कारण त्याला उपचारांसाठी अमेरिकेला जायचं होतं. शिवाय मी इतक्या कलाकारांच्या वेळापत्रकात बदल करणं सोपं नव्हतं. या मुलाखतीत अहमद खान यांनी सांगितलं की, चित्रपट सोडल्यानंतर संजय दत्तने निर्मात्यांची खूप मदत केली. संजय दत्तने स्वतः सुनील शेट्टीला फोन केला आणि या भूमिकेसाठी त्याला तयार केलं. त्यानंतर त्याने जॅकी श्रॉफ यांच्याशी देखील संपर्क साधला आणि त्यांनी सुनील शेट्टीची भूमिका साकाराण्यासाठी राजी केलं. आम्ही त्यांच्या या पाठिंब्याबद्दल सदैव आभारी राहू, अशा भावना अहमद खान यांनी व्यक्त केल्या. 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटात एकूण ३४ कलाकार मुख्य भूमिकेत आहेत.



# सनी देओल पुन्हा वकिलाच्या भूमिकेत

बॉलिवूड अभिनेता सनी देओल आता ओटीटी प्लॅटफॉर्मवर दमदार एंट्री करण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याच्या आगामी 'इक्का' या कोर्टरूम ड्रामा चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर १० जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे. 'इक्का' हा सस्पेन्स आणि कोर्टरूम ड्रामाने भरलेला चित्रपट आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सिद्धार्थ पी. मल्होत्रा यांनी केले आहे. यापूर्वी त्यांनी 'महाराज' या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते.

'इक्का'मध्ये सनी देओलसोबत अक्षय खन्ना महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. याशिवाय दिया मिर्झा आणि तिलोत्तमा शोमे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. या चित्रपटाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे सनी देओल पुन्हा एकदा वकिलाच्या भूमिकेत दिसणार आहे. १९९३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दामिनी' या चित्रपटात त्यांनी साकारलेला वकील आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. तब्बल ३३ वर्षांनंतर सनी पुन्हा काळा कोट घालून न्यायालयात लढताना दिसणार असल्याने चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता आहे.'इक्का'ची कथा एका गाजलेल्या हाय- प्रोफाइल खून प्रकरणाभोवती फिरते. या चित्रपटात अक्षय खन्ना 'शौर्यमान गौर' नावाच्या श्रीमंत उद्योगपतीच्या मुलाची भूमिका साकारत आहे. त्याच्यावर एका तरुणीच्या खुनाचा गंभीर आरोप असतो. मात्र, तो स्वतःला निर्दोष असल्याचा दावा करतो. या प्रकरणातून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी तो शहरातील प्रसिद्ध आणि अनुभवी वकील अर्जुन मेहरा यांची मदत घेतो. अर्जुन मेहरा ही भूमिका सनी देओल साकारत आहेत.

कोर्टात सुरू होणाऱ्या या लढतीत सत्य काय आहे, आरोपी खरोखरच निर्दोष आहे की दोषी, याचा उलगडा चित्रपटात होताना दिसणार आहे. ट्रेलरमध्ये सनी देओल आणि अक्षय खन्ना यांच्यातील संवाद, न्यायालयातील युक्तिवाद आणि सस्पेन्सने भरलेले प्रसंग प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतात. प्रत्येक दृश्यात उत्कंठा कायम ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे हा चित्रपट शेवटपर्यंत प्रेक्षकांना खिळवून ठेवेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दिया मिर्झा आणि तिलोत्तमा शोमे यांच्या भूमिकाही कथेला महत्त्वपूर्ण वळण देणाऱ्या आहेत. त्यामुळे हा केवळ कोर्टरूम ड्रामा नसून सस्पेन्स, भावना आणि रहस्य यांचा संगम असलेला चित्रपट ठरणार असल्याचे ट्रेलरवरून स्पष्ट होते. नेटफ्लिक्सवर थेट प्रदर्शित होणाऱ्या 'इक्का'कडून प्रेक्षकांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. विशेष म्हणजे, सनी देओलचा पुन्हा एकदा वकिलाच्या भूमिकेतील दमदार अंदाज पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. दुसरीकडे, अक्षय खन्नाचा गूढ आणि प्रभावी अभिनयही चित्रपटाची उत्सुकता वाढवत आहे.




# ‘मुन्नाभाई ३’ येणार भेटीला


बॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय फ्रँचायझींपैकी एक असलेल्या ‘मुन्नाभाई एमबीबीएस’ आणि ‘लगे रहो मुन्नाभाई’ या चित्रपटांनंतर चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. तब्बल दोन दशकांनंतर दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांनी ‘मुन्नाभाई ३’ संदर्भात महत्त्वाची घोषणा केली असून चित्रपटाच्या पटकथेवर सध्या काम सुरू असल्याची अधिकृत माहिती एका मुलाखतीदरम्यान दिली आहे. ‘प्रेम पेद्रो’ या आगामी ओटीटी मालिकेच्या प्रमोशनदरम्यान एका न्यूज चॅनेलसोबत संवाद साधताना राजकुमार हिरानी यांनी हा खुलासा केला. ते म्हणाले की, ‘मुन्नाभाई’च्या तिसऱ्या भागाची कथा पूर्ण झाली असून पटकथा अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत आहे. त्यामुळे संजय दत्त आणि अर्शद वारसी यांची गाजलेली ‘मुन्ना’ आणि ‘सर्किट’ ही जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. मात्र, चित्रपटाचे अधिकृत नाव, कोणकोण कलाकार असणार किंवा प्रदर्शनाची तारीख याबाबत माहिती समोर आलेली नाही. दरम्यानच्या काळात ‘मुन्नाभाई चले अमेरिका’ हे नाव तिसऱ्या भागाला देण्यात आल्याची चर्चा होती. त्याचा टीझरही समोर आला होता. मात्र, नंतर याबाबत कोणतीही माहिती समोर न आल्याने हा प्रोजेक्ट बंद झाल्याचे सांगण्यात आले होते. याविषयी बोलताना राजकुमार हिरानी यांनी मोठा खुलासा केला आहे. ते म्हणाले, तो टीझर केवळ एका कल्पनेवर आधारित होता. त्यानंतर कथेला योग्य दिशा मिळाली नाही. आता मात्र आम्ही विविध कल्पनांवर काम करत आहोत आणि मुन्ना- सर्किटची जोडी दमदार कथेसह प्रेक्षकांसमोर आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. राजकुमार हिरानी यांच्या या घोषणेनंतर ‘मुन्नाभाई ३’ची चर्चा पुन्हा रंगली असून, संजय दत्त आणि अर्शद वारसी यांच्या पुनरागमनाची चाहत्यांना मोठी उत्सुकता लागली आहे.

# ईशा देओलला जाणवतोय एकटेपणा!



हेमा मालिनी यांची लेक आणि अभिनेत्री ईशा देओल गेल्या काही दिवसांपासून तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आहे. आधी घटस्फोट त्यानंतर वडील अभिनेते धर्मेंद्र यांचं निधन. यामुळे ईशा खासगी आयुष्यात कठीण काळातून जात आहे. अशातच आता अभिनेत्रीने घटस्फोटानंतर तिला तिच्या आयुष्यामध्ये प्रेमाची कमतरता जाणवते असं सांगितलं आहे. ईशा देओलने उद्योगपती भरत तख्तानीपासून विभक्त झाल्यानंतरच्या आयुष्याबद्दल मनमोकळेपणाने भाष्य केलं आहे. २०२४ मध्ये लग्नाच्या दहा वर्षांहून अधिक काळानंतर दोघांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. ईशाने सांगितलं की, आयुष्यात प्रेम आणि रोमान्सची उणीव तिला नक्कीच जाणवते. मात्र, आलेल्या कठीण अनुभवांनंतरही तिचा प्रेमावरील विश्वास अजिबात कमी झालेला नाही. भविष्यात पुन्हा एकदा प्रेम तिच्या आयुष्यात येईल, अशी आशा ती बाळगून आहे. या अनुभवाबद्दल बोलताना ईशाने सांगितलं की, तिला तिच्या घटस्फोटाची मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ नये असं वाटत होतं. मात्र, सेलिब्रिटी असल्यामुळे तिला आणि भरतला ही परिस्थिती संयमाने, संवेदनशीलतेने आणि सन्मानाने हाताळावी लागेल, याची त्यांना जाणीव होती. ईशा पुढे म्हणाली, माझ्या मते, एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात प्रेम आणि रोमान्स या सर्वात महत्त्वाच्या गोष्टी आहेत आणि सध्या मला त्यांचीच उणीव जाणवत आहे. मी खूप रोमँटिक आहे. मी पूर्णपणे रोमान्टिक-कॉमेडी चित्रपटांची चाहती आहे. मला प्रेमगीतं आणि प्रेमकथा खूप आवडतात. ईशाला घटस्फोटानंतर प्रेमावरचा विश्वास कायम आहे की कमी झाला असं विचारल्यानंतर ती म्हणाली, नाही, अशा गोष्टींमुळे प्रेमाविषयीचा माझा विश्वास बदलत नाही. आयुष्यात ब्रेकअप होतात. यापूर्वीही माझे काही बॉयफ्रेंड होते आणि आमचं नातं संपलं. हा आयुष्याचा भाग आहे. पण त्यामुळे माझ्या मनातील प्रेमाची संकल्पना बदललेली नाही. यावेळी ईशाने तिचे आई-वडील धर्मेंद्र आणि हेमा मालिनी यांच्या नात्याचाही उल्लेख केला. त्यांच्या नात्यातील निःस्वार्थ प्रेम, परस्परांचा आदर आणि सन्मान आजच्या काळात क्वचितच पाहायला मिळतो, असं तिने सांगितलं.



# जान्हवीने दिली प्रेमाची हटके कबुली?

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर ही तिच्या अभिनयासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असते. गेल्या काही वर्षांपासून तिचं नाव शिखर पहाडियासोबत जोडलं जात आहे. जरी या दोघांनी त्यांच्या नात्याबद्दल अधिकृत घोषणा केलेली नसली, तरी अनेक सार्वजनिक कार्यक्रम, सोशल मीडिया पोस्ट आणि एकत्र दिसणाऱ्या त्यांच्या उपस्थितीमुळे त्यांच्या नात्याबद्दल सातत्याने चर्चा होत असते. आता पुन्हा एकदा जान्हवी तिच्या खास लूकमुळे चर्चेत आली आहे. यावेळी तिच्या कपड्यांवरील एका मजेशीर संदेशाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तिचा हा फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अलीकडेच एका इन्स्टाग्राम पेजवर जान्हवीचा एक फोटो शेअर करण्यात आला. या फोटोमध्ये तिने गुलाबी रंगाचा नाईट ड्रेस आणि त्यावर राखाडी रंगाचं जॅकेट परिधान केलं होतं. मात्र, तिच्या ड्रेसवरील एका ओळीने सर्वांची उत्सुकता वाढवली. त्या टी-शर्टवर इंग्रजीमध्ये लिहिलं होतं, If lost, please return Shikhar Pahariya, म्हणजेच जर मी हरवले, तर कृपया मला शिखर पहाडिया यांच्याकडे परत करा. हा संदेश पाहून सोशल मीडियावर चाहत्यांनी आनंद व्यक्त केला. अनेकांनी ही प्रेम व्यक्त करण्याची खूपच गोंडस आणि वेगळी पद्धत असल्याचं म्हटलं. जान्हवी आणि शिखर अनेक वर्षांपासून एकमेकांना डेट करत असल्याची चर्चा आहे. गेल्या वर्षी ‘कान्स फिल्म फेस्टिव्हल’ दरम्यानही शिखर जान्हवीसोबत दिसला होता. याआधीही जान्हवीने शिखरबद्दलचं प्रेम वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त केलं होतं. काही दिवसांपूर्वी तिने शिखरच्या नावाचं पेंडंट असलेला नेकलेस परिधान केला होता. आता नाईट ड्रेसवरील या खास संदेशामुळे पुन्हा एकदा त्यांच्या नात्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, जान्हवी कपूरच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास, तिचा आणि दक्षिणात्य सुपरस्टार राम चरण यांचा बहुचर्चित ‘पेड्डी’ चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचं सांगितलं जात आहे. ‘पेड्डी’ हा जान्हवीचा दुसरा टॉलीवूड चित्रपट आहे. हिंदी चित्रपटांबरोबरच ती आता दक्षिणात्य चित्रपटसृष्टीतही स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत आहे.

# सामंथा रुथच्या 'मा इंटी बंगारम'ने रचला इतिहास

सामंथा रुथ प्रभू अभिनीत 'मा इंटी बंगारम' हा चित्रपट काही दिवसांपुर्वी प्रदर्शित झाला आहे. तसेच हा चित्रपट सध्या प्रेक्षकांची मने जिंकत आहे. हा तेलुगू चित्रपटसृष्टीतला उत्तम चित्रपट ठरला आहे. या आधी अनुष्का शेट्टीचा २००९ सालचा नायिकाप्रधान चित्रपट 'अरुंधती' हा तेलुगू चित्रपटसृष्टीसाठी एक मानदंड ठरला होता. तर आता सामंथा रुथ प्रभू ही एक उत्तम अभिनेत्री आहे. तिने अनेक चित्रपटामधुन तिचे स्थान निर्माण केले आहे. तसेच आता तिचा 'मा इंटी बंगारम'ने एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. मा इंटी बंगारम हा चित्रपट १९ जून रोजी प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाने जगभरात ८३ कोटींहून अधिक आणि भारतात ५० कोटी रुपयांची कमाई केली आहे, ज्यामुळे तो तेलुगू चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वाधिक कमाई करणारा नायिकाप्रधान चित्रपट ठरला आहे. हा विक्रम या आधी 'अरुंधती' या चित्रपटाने केला होता. ज्यात अनुष्का आणि सोनू सूद यांनी भूमिका साकारल्या होत्या. त्यावेळी, चित्रपटाने जगभरात ७० कोटींहून अधिक कमाई केली होती. आता, 'मा इंटी बंगारम'ने हा विक्रम आपल्या नावावर केला आहे. हा एक तेलुगु चित्रपट आहे. आणि हा चित्रपट तेलुगू सिनेमातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. तर दक्षिण भारतीय सिनेमातील सर्वाधिक कमाई पाहिले तर लोका: चॅप्टर १- चंद्रा हा चित्रपट आहे. या चित्रपटात कल्याणी प्रियदर्शन आणि नसलीन यांची प्रमुख भूमिका होत्या. तर दुल्कर सलमान निर्मित या चित्रपटाने जगभरात ३०० कोटींहून अधिक कमाई केली होती.






# प्रभासचा 'बाहुबली ३' येणार?

साऊथमधील सगळ्यात गाजलेला 'बाहुबली' सिनेमा ब्लॉकबस्टर ठरला होता. बाहुबली नंतर त्याचा स्वीक्वल बाहुबली २ने देखील प्रेक्षकांची मनं जिंकली होती. आता या फ्रॅन्चायजीचा पुढचा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची चर्चा रंगली आहे. प्रभास, अनुष्का शेट्टी आणि राणा दग्गुबती प्रमुख भूमिकेत असलेल्या 'बाहुबली'च्या पुढच्या भागाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत.

'बाहुबली ३'बद्दल आता खुद्द कलाकारांनीच हिंट दिली आहे. 'बाहुबली' फेम प्रभास, अनुष्का आणि राणा दग्गुबतीचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये राणा दग्गुबती म्हणतो, मला माहीत नाही हे सगळ्यांसमोर बोललं पाहिजे की नाही. राजामौली सर इथे नाहीयेत. पण जे माझ्या मनात आहे ते मी बोलणार. कदाचित तुम्ही यासाठी तयार नसाल. पण, बाहुबली नक्कीच येईल. त्यानंतर प्रभास हसत त्याच्या बोटांनी ३ असं दाखवताना दिसत आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर खरंच 'बाहुबली ३' येणार का? असा प्रश्न चाहते विचारत असून ते उत्सुक झाले आहेत. २०१५ मध्ये 'बाहुबली : द बिगिनिंग' हा पहिला भाग प्रदर्शित करण्यात आला होता. जो ब्लॉकबस्टर ठरला होता. राणा दग्गुबाती, अनुष्का शेट्टी, तमन्ना भाटिया, राम्या कृष्णन, सत्यराज अशी सिनेमाची स्टारकास्ट होती. त्यानंतर दोन वर्षांनी याचा सीक्वल प्रदर्शित केला गेला. २०१७ मध्ये बाहुबली : द कन्क्लुजन सिनेमा रिलीज झाला. ज्याने १७८८ कोटींची कमाई केली. आता ९ वर्षांनी या सिनेमाचा तिसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येत असल्याची चर्चा आहे.

# 'टॉक्सिक'मध्ये दिसली पाच अभिनेत्रींची झलक

साऊथ सुपरस्टार यशच्या 'टॉक्सिक' सिनेमाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. या सिनेमाची जोरदार चर्चा सुरू आहे. 'टॉक्सिक' सिनेमाचा नवा टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे. या टीझरमधून सिनेमातील अभिनेत्रींची झलक दाखवण्यात आली आहे. यशच्या 'टॉक्सिक'मध्ये एक नव्हे तर पाच अभिनेत्री दिसणार आहेत.

'टॉक्सिक'मध्ये नयनतारा, कियारा अडवाणी, तारा सुतारिया, रुक्मिणी वसंत आणि हुमा कुरेशी यांची वर्णी लागली आहे. टीझरच्या सुरुवातीलाच एक वॉर्निंग मेसेज येत असल्याचं दिसत आहे. त्यानंतर बीचवरील एका इंटिमेट सीनने टीझरला सुरुवात होते. 'टॉक्सिक'च्या या लेडीज स्पेशल टीझरमध्ये सुरुवातीला बाईकवरुन नयनताराची एन्ट्री होताना दिसत आहे. त्यानंतर ग्लॅमरस लूकमध्ये कियारा अडवाणी चाहत्यांना सरप्राइज देते. त्यानंतर पबमध्ये तारा सुतारिया तिचा अंदाज दाखवताना दिसत आहे. याशिवाय रुक्मिणी वसंतचा हातात बंदूक घेतल्याचा डॅशिंग अवतार पाहायला मिळत आहे. आणि शेवटी हुमा कुरेशीची झलक टीझरमध्ये पाहायला मिळत आहे. 'टॉक्सिक'चा हा लेडिज स्पेशल टीझर इंटिमेट सीन्स आणि ॲक्शन सीक्वेन्सने पुरेपूर आहे.

यशसोबत कियारा अडवाणीला पाहून चाहते थक्क झाले आहेत. 'टॉक्सिक'चा हा लेडिज स्पेशल टीझर चाहत्यांच्या पसंतीस उतरला असून याने प्रेक्षकांची सिनेमाबाबतची उत्सुकता वाढवली आहे. हा सिनेमा २६ ऑगस्टला सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.




# ‘एक होतं माळीण’चा टीझर प्रदर्शित




पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीण या गावामध्ये एक भीषण दुर्घटना घडली होती. ३० जुलै २०१४ ची ती रात्र माळीण गावासाठी काळरात्र बनून आली होती. मुसळधार पावसामुळे डोंगराचा मोठा भाग कोसळला आणि अवघे गाव काही क्षणांत मातीच्या ढिगाऱ्या खाली गाडले गेले. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, असंख्य स्वप्ने कायमची संपली आणि सुमारे १५१ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला होता. याच सत्य घटनेवर आधारित ‘एक होतं माळीण’ हा चित्रपट आता प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. चित्रपटाचा अंगावर शहारे आणणारा टीझर प्रदर्शित झाला आहे. ‘एक होतं माळीण’ चित्रपटाच्या टीझरमध्ये आनंदाने नांदणारे गाव एका रात्रीत भयाण आणि ओसाड झाल्याचे दाखवण्यात आले आहे. चिमुकले बाळ रडताना या टीझरची सुरुवात झाली असून, त्यामध्ये तुफान पावसामुळे डोंगराळ भाग घसरून गाव पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याचे दाखवण्यात आले आहे. गावामध्ये आनंदाने सणवार, यात्रा साजरी करणारे गावकरी आणि हसती-खेळती कुटुंबे नांदत असताना ते गाव मुसळधार पावसामुळे पूर्णपणे नष्ट झाल्याचे दाखविण्यात आले आहे. त्यासाठी व्हीएफएक्सचा वापर करण्यात आल्याचे दिसून येत आहे. दुर्घटनेतून वाचलेल्या लोकांनी आपल्या कुटुंबाला मारलेली आर्त हाक मनाला सुन्न करते. ‘एक होतं माळीण’ या चित्रपटाच्या टीझरने त्या घडलेल्या दुर्घटनेची आठवण पुन्हा एकदा जागी झाली आहे. ‘एक होतं माळीण’ चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन दत्तात्रय गायकर व राजू राणे यांनी केले आहे. तसेच ‘ड्रीम डॉट क्रिएशन प्रॉडक्शन’ने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. यामध्ये प्रशांत मोहिते, अश्विनी कासार, अभिजित श्वेतचंद्र, सिद्धी पाटणे हे कलाकार झळकणार आहेत. त्याचबरोबर अनिल नगरकर, प्रशांत तपस्वी, रामचंद्र धुमाळ, अक्षय म्हात्रे, दीपज्योती नाईक व अनुज ठाकरे या कलाकारांनीही भूमिका साकारल्या आहेत. अजय-अतुल यांची गाणी असलेला हा चित्रपट २४ जुलै रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

# नागराज मंजुळेंचा झुंजार ‘खाशाबा’ येणार भेटीला!




मनोरंजनसृष्टीतील आघाडीचे चित्रपट दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या बहुप्रतीक्षित ‘खाशाबा’ सिनेमाचा टीझर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. हा सिनेमा दिवंगत कुस्तीपटू खाशाबा जाधव यांच्या जीवनावर आधारित आहे.

१९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये त्यांनी कांस्यपदक पटकावलं होतं. स्वतंत्र भारतामध्ये वैयक्तिक ऑलिम्पिक पदक जिंकणारे पहिले भारतीय कुस्तीपटू खाशाबा दादासाहेब जाधव यांचा जीवनप्रवास या सिनेमातून प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. खाशाबा यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये इतिहास रचला होता. नागराज मंजुळेंनी खाशाबा जाधव यांच्या भूमिकेसाठी नव्या चेहऱ्याची निवड केली आहे. या अभिनेत्याचं नाव सध्या गुलदस्त्यात ठेवलं असून, लवकरच त्याचा चेहरा रिव्हिल करण्यात येईल. सध्या ‘खाशाबा’ सिनेमाचा पहिला टीझर आणि याची रिलीज डेट जाहीर करण्यात आली आहे. एका झुंजार नायकाचा असाधारण जीवनप्रवास खाशाबा चित्रपटाच्या निमित्ताने मांडला जाणार आहे. जिओ स्टुडिओज आणि आटपाट निर्मित आगामी मराठी चित्रपट ‘खाशाबा’चे चित्रीकरण सुरू झाल्याची घोषणा काही दिवसांपूर्वीच नागराज मंजुळेंनी केली होती.

आता या सिनेमात मुख्य भूमिका कोण साकारणार याबद्दल चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे. बहुप्रतीक्षित ‘खाशाबा’ सिनेमा १ जानेवारी २०२७ रोजी प्रदर्शित होणार आहे. यामध्ये जितेंद्र जोशी, महेश मांजरेकर, गिरीश कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, संदेश कुलकर्णी, सुरेश विश्वकर्मा, वैभव मांगले, छाया कदम, गार्गी कुलकर्णी, ओम भूतकर अशा दमदार कलाकारांची मांदियाळी असणार आहे. तसेच संभाजीराजे छत्रपती सुद्धा या सिनेमात झळकणार आहेत. ‘खाशाबा’ सिनेमाच्या टीझरवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. नागराज मंजुळे यांनी या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. तर, ज्योती देशपांडे आणि गार्गी कुलकर्णी यांनी या सिनेमाची निर्मिती केली आहे.

नवीन वर्षाच्या सुरुवातीला म्हणजेच १ जानेवारी २०२७ रोजी हा सिनेमा जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. दरम्यान, नेटकऱ्यांनी या टीझरवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. अनेकांनी हा सिनेमा १०० कोटींच्या पार कमाई करेल असाही अंदाज वर्तवला आहे. तर, काही युजर्सनी मुख्य भूमिका साकारणार अभिनेता सैराट फेम सूरज पवार असेल, आदिनाथ कोठारे असेल असे अंदाज व्यक्त केले आहेत. मात्र, प्रत्यक्षात मुख्य अभिनेत्याची निवड नागराज मंजुळेंनी महाराष्ट्रभरात ऑडिशन घेऊन केली आहे आणि लवकरच त्याचं नाव जाहीर केलं जाईल.


# लांजेकरांचे सातवे पुष्प ‘दर्याभवानी’




दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांच्या बहुचर्चित ‘शिवराज अष्टक’ चित्रपटांमधील सातवे चित्रपुष्प समोर आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यावर आधारित या चित्रपटांच्या मालिकेतील सातव्या चित्रपटाचे पोस्टर रिलीज करण्यात आले आहे. ‘शिवराज अष्टक’मधील सातवे चित्रपुष्प हे ‘दर्याभवानी’ असणार आहे. याचे लक्षवेधी पोस्टर रिलीज झाले असून यामध्ये चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखदेखील समोर आली आहे. दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित ‘दर्याभवानी’ चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यनिर्मिती करताना दाखवलेले शौर्य आणि त्यांना भक्कम साथ देणाऱ्या शिलेदारांची कथा शिवराज अष्टकमधून मांडली जाते. शिवराज अष्टकमधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित सलग आठ चित्रपट तयार करण्यात येणार आहेत. यामधील सहा चित्रपट यापूर्वी प्रदर्शित झाले असून त्यांना प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला आहे. यानंतर आता सातवा चित्रपट ‘दर्याभवानी’चे पोस्टर रिलीज करण्यात आले आहे. हा चित्रपट मराठा आरमाराचे पहिले प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या पराक्रमावर आधारित असणार आहे. कान्होजी आंग्रे यांच्या शौर्याचा प्रवास मोठ्या पडद्यावर मांडण्यात येणार आहे.

‘दर्याभवानी’ सिनेमाचे लेखन व दिग्दर्शन दिग्पाल लांजेकर यांनी केले आहे. तसेच श्री तिरुपती बालाजी चित्र, प्रकाश पाटील, डॉ. अशोक जीवतोडे आणि एलिव्हेट फिल्म्स यांनी निर्मिती केली आहे. पुष्कर यावलकर सहनिर्माता असून नितीन वाघ हे सह लेखक आहेत. यामध्ये अभिजीत श्वेतचंद्र, मृणाल कुलकर्णी, समीर धर्माधिकारी, स्मिता शेवाळे, अजय पूरकर, मृण्मयी देशपांडे, ऋषी सक्सेना, आस्ताद काळे, प्रसन्न केतकर, निखिल राऊत, नितीन वाघ आणि सचिन देशपांडे या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. पोस्टरमध्ये हा सिनेमा पुढील वर्षी रिलीज होणार असल्याचे नमूद केले आहे. १५ जानेवारी २०२७ रोजी ‘दर्याभवानी’ चित्रपटगृहात रिलीज होणार आहे. शिवराज अष्टक ही लेखक आणि दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांची महत्त्वाकांक्षी आणि लोकप्रिय चित्रपट मालिका आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि त्यांचे कार्य पडद्यावर मांडण्यात येत आहे. २०१८ पासून ही मालिका सुरू असून यातील सहा चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. ‘फर्जंद’ (२०१८), ‘फत्तेशिकस्त’ (२०१९), ‘पावनखिंड’ (२०२२), ‘शेर शिवराज’ (२०२२), ‘सुभेदार’ (२०२३), ‘शिवरायांचा छावा’ (२०२४) असे चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. यानंतर आता सातवे पुष्प हे सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या समुद्रातील आरमार उभारणीवर आधारित असणार आहे. या चित्रपटाचे पोस्टर रिलीज करण्यात आले असून यामध्ये मावळ्यांची समुद्रावरील ताकद दाखवण्यात आली आहे.

**'श्यामसुंदर राजसा...' १९३२-३३ सालच्या सरस्वती मूव्हिटोनच्या 'श्यामसुंदर' चित्रपटात शांता आपटे या नऊ वर्षाच्या बाल गायिकेला वरील सुश्राव्य गीत गाण्याचा व शाहू मोडकसोबत राधेची भूमिका करण्याची संधी दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांच्यामुळे मिळाली अन् या दोघांचेही बोलपटात पदार्पण झाले. हा चित्रपट मराठीतील पहिला बालचित्रपट, पुण्यात निर्मिती झालेला व मुंबईत न्यू वेस्ट अँड सिनेमागृहात रौप्यमहोत्सवी ठरला होता. 'धार दे गो कपिला माई। कान्हा दूध मागतो...' १९३५ साली कोल्हापूर मूव्हिटोनद्वारे प्रस्तुत पौराणिक सिनेमा 'कालिया मर्दन'मधील गाणी व दिग्दर्शन भालजींचेच होते. सुप्रसिद्ध गायक वसंतराव देशपांडे यांच्याकडून वयाच्या आठव्या वर्षी बाळकृष्ण साकारला होता. त्यांनाही सिनेमात संधी भालजींनीच दिली होती.**




**'तिन्ही सांज गेली गं पाण्याला सखे।
सूरत पाहुन नैन दोन्ही देखून।
चंद्र सूर्य वाट आलं....जी जी जी...'**
१९३७ सालच्या 'स्वराज्याच्या सीमेवर' सिनेमातील भालजींनी लिहिलेली वरील चटपटीत लावणी मराठीतील पहिली लावणी असावी. दिनकर कामन्ना यांनी सुरात सजवली. १९४२ चा 'सूनबाई' चित्रपट भालजींच्या प्रतिभाशाली दिग्दर्शनातला दर्जेदार चित्रपट होता. भालजींनी तत्कालीन कौटुंबिक मूल्य व सासरचे वातावरण खुबीने चित्रित केले. राजा परांजपे यांचा हा पहिला चित्रपट होता. चित्रपट व्यवसाय धंदा म्हणून भालजींनी कधीच केला नाही. त्यांना केवळ उच्च निर्मिती मूल्यांचा ध्यास होता. लता मंगेशकरमधील संगीतकार ही कला त्यांनी सर्वप्रथम भालजींनी ओळखली. लतादीदींनी नंतर 'आनंदघन' नावाने ४-५ मराठी चित्रपटांना संगीतही दिले. चंदेरी दुनियेत वावरूनही भालजी अखेरपर्यंत 'साधा माणूस' म्हणूनच जगले. त्यांनी अनेक कलाकारांना चित्रपटात स्थान मिळवून दिले.

**'वासुकीचा दोर बाई। समुंदराचा डेरा।
कधी येईल दसरा। कधी येईल परदेव हसरा।।'** 'आमचे साहित्य दुधासारखे पवित्र आहे. ते पावित्र्याची भूक शांत करते' हे उद्गार प्रसिद्ध साहित्यिक मुन्सी प्रेमचंद यांचे आहेत. मराठीतील भालजी पण त्याच मताचे होते.

**घरोघरी मातीच्या चुली, अवघ्या संसारी जाशील का सोडूनि**
१९४८ च्या भालजींच्या 'मीठ भाकर'मधील वरील दोन्ही गाणी त्या काळात मराठी स्त्रिया आपली नित्याची कामे करताना गुणगुणत गाण्याचा आनंद घ्यायच्या. १९४८ साली कोल्हापूर येथील त्यांचा प्रभाकर स्टुडिओ आगीत भस्मसात झाल्यावर 'मीठ भाकर'ची निगेटिव्ह पण जळाली. त्यांच्या निष्ठावान कलाकारांनी पुन्हा मानधन घेतले नाही अन् हा चित्रपट भालजींनी नव्याने बनविला.

**बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला...**
**१९६३- मोहित्यांची मंजुळा:** जगदीश खेबूडकरांच्या काव्यातील अस्सल ग्रामीण बाज भालजींनी दिग्दर्शन चातुर्याने चित्रपट चपखल सादर केला. मोठ्या आंबाड्यातून बाहेर आलेली खांद्यावर रुळणारी केसांची लट, गळ्यात डोरलं, भाळी कुंकू अशी सजलेली जयश्री गडकर, डोईवर पाण्याने भरलेली घागर घेऊन घरात येते. सैनिक घर धन्याची शस्त्रे खुंटीवर टांगते तसेच सुपाने धान्य पाखडण्याचे चित्रीकरण हे सर्व कसलेल्या दिग्दर्शकाचेच कसब आहे.

**अखेरचा हा तुला दंडवत सोडुन जाते गाव...**
**१९६४- मराठा तितुका मेळवावा:** छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुरुवातीच्या काळात मोगल व आदिलशाही अत्याचारी गावावर आक्रमण करणार म्हणून बैलगाडीतून गाव सोडून जातानाच्या प्रसंगी देवाला देऊळ सोडून मदतीचा धावा करतानाचे हे भालजींनी लिहिलेले गाणे आहे. 'हाय सोडुन जाते आता...' काहीच तरणोपाय नसल्यामुळे अगतिकतेने हा अंतरा लिहिला आहे.

**माळ्याच्या मळ्यामंदी पाटाचं पाणी वाहे...**
**१९६५- साधी माणसं:** हा चित्रपट लता यांच्या लतादिदि यांनी नंतर 'आनंदघन' नावाने दिलेल्या संगीताने व स्वराने संगीताच्या दुनियेतील सूरसागर ठरला आहे. निर्माता निर्देशक भालजींनी यात योगेश नावाने काही गीते लिहिलीत. हे त्यांचेच गीत आहे. लोहाराची पत्नी जयश्री गडकर माहेरच्या आठवणीत...

**'राबतो बंधुराया मातीचं झालं सोनं।
नजर काढू कशी जिवाचं लिंबलोण...'**
शेतात कामकरीत असलेला बंधुराया डोळ्यासमोर येतो. त्याच्या कष्टाने मातीतून सोनं बाहेर आल्याची व जिवाचं लिंबलोण उतरून, दृष्ट काढण्याची अफलातून कल्पना भालजींनी केली आहे. 'ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे...' वरील चित्रपटातीलच जगदीश खेबूडकरांनी लिहिलेल्या या सर्वांगसुंदर गाण्यात लोहार कुटुंबाचे ऐरणीवरील तसेच भट्टी पेटविणाऱ्या भात्याचे चित्रिकरण भालजींच्या अफलातून व वास्तवतेच्या दर्शनातील दिग्दर्शन चातुर्याचेच फळ आहे. (१) ये गं रामाच्या बानाच्या (२) झाला साखरपुडा... १९६९ साली मैलाचा दगड ठरलेला 'तांबडी माती' नावाचा ग्रामीण संस्कृतीवर आधारित, शेती व मातीशी नाळ जोडणाऱ्या चित्रपटाची कथा व दिग्दर्शन भालजी यांनी केले. दादा कोंडके यांचे चित्रपटात पदार्पण याच चित्रपटाद्वारे झाले, हे विशेष.

२ मे १८९८ रोजी भालचंद्र गोपाळराव पेंढारकर यांचा जन्म कोल्हापूर येथे झाला. सहावीपर्यंत शिक्षण घेतल्यावर काही काळ लष्करात होते. नंतर पुण्यात नोकरी केली. पुण्यातील लक्ष्मी व अप-ोलो थिएटरात नोकरी करून १९२४ साली दादासाहेब तोरणे सोबत 'पृथ्वी वल्लभ' या मूकपटाची निर्मिती केली. बोलपटाच्या काळात लेखणीला धार चढली. पल्लेदार संवाद, साहित्याची खोल डूब व काळाशी सुसंगत वाक्यरचना यामुळे कथा, पटकथा, संवाद भारदस्त व खानदानी होत होत्या. कोल्हापूरला चित्रनिर्मिती करून सिनेमाचे तीर्थक्षेत्र बनविले. १९३२-३३ साली पहिलाच बोलपट 'श्यामसुंदर' यात कथा, पटकथा, संवाद व दिग्दर्शन करून आपली विविध क्षेत्रात मातब्बरी सिद्ध केली. त्यांनी ४५ चित्रपटांची निर्मिती व दिग्दर्शित केले. चित्रपटसृष्टीत ६४ वर्षाचे त्यांचे योगदान आहे... १९९१ साली दादासाहेब फाळके पुरस्काराने पुरस्कृत. केंद्रीय मंत्री अजित पांजा यांनी कोल्हापूरला येऊन हा पुरस्कार दिला. १९६६ साधी माणसं चित्रपटास राष्ट्रीय पुरस्कार तसेच महाराष्ट्र सरकारचे ९ पुरस्कार प्राप्त झाले. १९७० तांबडी माती चित्रपटास राष्ट्रीय पुरस्कार. १९९१- चित्रभूषण व १९९४ साली ग. दि. मा. पुरस्कार. चित्रपटसृष्टीतील दिग्गज पृथ्वीराज कपूर व दक्षिणेतील बी. एन. रेड्डी भालजींना गुरुस्थानी मानायचे. असे हे चित्रतपस्वी २६ नोव्हेंबर १९९४ रोजी कायमचे निघून गेले.

**रमेश पोफळी**

# अजय देवगणच्या नवीन सिनेमाची घोषणा



अजय देवगनने त्याचे वडील आणि प्रसिद्ध ॲक्शन डायरेक्टर वीरू देवगन यांच्या जयंतीनिमित्त आपल्या नवीन 'चौहान' या चित्रपटाची घोषणा केली आहे. यासोबतच मेकर्सनी या चित्रपटाची पहिली झलक देखील रिलीज केली आहे, ज्यामध्ये अजय देवगन वयाच्या ५७ व्या वर्षी पुन्हा एकदा ॲक्शन अवतारात दिसत असून तो 'चौहान' नावाचे पात्र साकारत आहेत. या चित्रपटाची कथा काश्मीरमधील दगडफेक करणाऱ्यांवर आधारित आहे. काश्मीरमधल्या तरुणांची कशाप्रकारे दिशाभूल केली जाते, हे यात दाखवण्यात आले आहे. या २ मिनिटे २४ सेकंदांच्या टीझरची सुरुवात २०१८ मधील काश्मीरच्या पुलवामा येथून होते, जिथे काही तरुण सैनिकांवर दगडफेक करत आहेत आणि सैन्य त्यांचा सामना करत आहे. काश्मीरमध्ये कशा प्रकारे तरुण मुलांची दिशाभूल करून त्यांना दगडफेक करायला लावली जाते, हे टीझरमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. गेल्या ७५ वर्षांत सरकारने या दगडफेक करणाऱ्यांना रोखण्यासाठी अश्रूधुराचे नळकांडे, पाण्याचे फवारे यांसारखे विविध प्रयत्न करे केले, पण तरीही त्यांच्यावर पूर्णपणे नियंत्रण मिळवता आले नाही, याचा उल्लेख यात आहे. काश्मीरमध्ये दगडफेक झाल्याने त्यात अनेक सैनिक जखमी झाले तर काहींना आपले प्राणही गमवावे लागले. टीझरच्या शेवटी अजय देवगणची एन्ट्री होते, जिथे तो चेहऱ्यावर एक भयानक मास्क लावलेला दिसतो. चित्रपटात तो जबरदस्त ॲक्शन करताना दिसणार असून त्याच्या पात्राचे नाव 'चौहान' आहे. 'चौहान' या चित्रपटाची निर्मिती जिओ स्टुडिओ आणि आनंद एल. राय यांच्या कलर यलो प्रॉडक्शन हाऊसने मिळून केली आहे. तसेच हिमांशू शर्मा देखील या चित्रपटाचे सह-निर्माते आहेत. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन नीरज यादव यांनी केले आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून ५७ वर्षांचा अजय देवगन पुन्हा एकदा क्शन मोडमध्ये पाहायला मिळेल. मेकर्सनी चित्रपटाच्या रिलीज डेटचीही घोषणा केली असून 'चौहान' पुढील वर्षी म्हणजेच १ ऑक्टोबर २०२७ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.



# मराठी रंगभूमीची 'बाई'!

नाट्यविश्वात विजया मेहता यांना प्रेमाने 'बाई' या नावाने ओळखले जात असे. अनेक कलाकारांसाठी त्या केवळ दिग्दर्शिका नव्हत्या, तर मार्गदर्शक आणि गुरू होत्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कलाकार घडले आणि मराठी रंगभूमीला नवे आयाम मिळाले. विजया मेहता यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९३४ रोजी गुजरातमधील बडोदा येथे झाला. त्यांनी मुंबई विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर अभिनय आणि रंगभूमीचे शिक्षण घेण्यासाठी त्यांनी प्रसिद्ध रंगकर्मी इब्राहिम अल्काझी यांच्याकडून दिल्लीत प्रशिक्षण घेतले. तसेच मुंबईतील आदि मर्झबान यांच्याकडूनही त्यांनी नाट्यकलेचे बारकावे शिकले. या भक्कम पायामुळे त्यांच्या दिग्दर्शनात नेहमीच वेगळेपणा, अभ्यासपूर्ण मांडणी आणि कलात्मकता दिसून आली. १९६० च्या दशकात विजया मेहता यांनी मराठी रंगभूमीवर अनेक नवे प्रयोग केले. त्यावेळी व्यावसायिक नाटकांचीच अधिक चलती होती. मात्र त्यांनी समाजातील वास्तव, मानवी नातेसंबंध आणि गंभीर विषयांवर आधारित प्रायोगिक नाटकांना प्राधान्य दिले. त्यांच्या या धाडसी प्रयोगांमुळे मराठी रंगभूमीला नवी ओळख मिळाली आणि देशभरातील नाट्यविश्वावर त्याचा प्रभाव पडला. याच काळात त्यांनी ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर, अभिनेते डॉ. श्रीराम लागू आणि अरविंद देशपांडे यांच्यासोबत 'रंगायन' या नाट्यसंस्थेची स्थापना केली. या संस्थेने मराठी रंगभूमीवर मोठे परिवर्तन घडवून आणले. सामाजिक वास्तव मांडणारी, विचार करायला लावणारी आणि नाटकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणारी अनेक नाटके 'रंगायन'च्या माध्यमातून सादर करण्यात आली. विजया मेहता यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेली अनेक नाटके आजही मराठी रंगभूमीतील मैलाचे दगड मानली जातात. 'एक शून्य बाजीराव' हे त्यांचे सर्वाधिक गाजलेले नाटक ठरले. तसेच जर्मन नाटककार बर्टोल्ट ब्रेख्त यांच्या नाटकाचे मराठी रूपांतर असलेले 'अजब न्याय वर्तुळाचा' हे नाटकही प्रचंड लोकप्रिय झाले. याशिवाय 'बॅरिस्टर', 'शाकुंतल', 'हमीदाबाईची कोठी' आणि 'मदर' यांसारख्या नाटकांचे त्यांनी प्रभावी दिग्दर्शन केले. त्यांच्या प्रत्येक कलाकृतीत विषयाची सखोल मांडणी, उत्कृष्ट कलाकार निवड आणि वेगळी रंगभाषा पाहायला मिळत असे. विजया मेहता यांनी केवळ नाटकांचे दिग्दर्शन केले नाही, तर भारतीय रंगभूमीला आधुनिक विचारांची दिशा दिली. त्यांच्या कामामुळे अनेक नवोदित कलाकारांना संधी मिळाली आणि मराठी नाटक राष्ट्रीय स्तरावर पोहोचले. त्यांच्या योगदानामुळे त्यांना देशभरात मानाचे स्थान मिळाले. त्यांच्या निधनाने मराठी रंगभूमीतील एका सुवर्णयुगाचा अंत झाल्याची भावना अनेक कलाकारांनी व्यक्त केली आहे. त्यांनी घालून दिलेला कलात्मक वारसा आणि नाटकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. मराठी नाट्यविश्वातील त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील.



# सेतुपतींच्या 'स्लमडॉग: ३३ टेम्पल रोड'चा टीझर आऊट

आपल्या अप्रतिम अभिनयासाठी जगभरात ओळखला जाणारा दाक्षिणात्य सुपरस्टार विजय सेतुपती पुन्हा एकदा एका अत्यंत आव्हानात्मक आणि हटके भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीस येण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याच्या आगामी 'स्लमडॉग: ३३ टेम्पल रोड' या पॅन-इंडिया चित्रपटाचा धमाकेदार टीझर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. टीझरमध्ये अभिनेता विजय सेतुपती एका अंध भिकाऱ्याच्या अत्यंत आव्हानात्मक भूमिकेत दिसत आहे. त्याने अंध व्यक्तीचे हावभाव अतिशय प्रभावीपणे साकारले आहेत. कन्नड सुपरस्टार 'दुनिया विजय' हा या चित्रपटात मुख्य खलनायकाच्या भूमिकेत असल्याचं दिसतंय. तर बॉलिवूड अभिनेत्री तब्बू या चित्रपटात एका कडक पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत एन्ट्री करताना दिसते. टीझर पाहिल्यावर प्रेक्षकांसमोर सर्वात मोठा प्रश्न उभा राहतोय की विजय सेतुपतीचे पात्र खरोखरच अंध आहे, की यामागे त्याचे काही मोठे रहस्य लपलेले आहे. 'पोखिरी' आणि 'बिझनेसमन' सारखे ब्लॉकबस्टर चित्रपट देणारे दिग्दर्शक पुरी जगन्नाथ यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. 'स्लम डॉग: ३३ टेम्पल रोड' हा चित्रपट संपूर्ण भारतात तेलुगू, तमिळ, कन्नड, मल्याळम आणि हिंदी अशा ५ भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. निर्मात्यांनी अद्याप चित्रपटाच्या प्रदर्शनाची अधिकृत तारीख जाहीर केली नसली, तरी टीझर रिलीज झाल्यामुळे प्रेक्षकांमधील उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

# 'बारह नंबर'मध्ये एहसास चन्ना

बॉलिवूड अभिनेता, कॉमेडियन आणि फिल्ममेकर वीर दासने स्वत:च्या पुढील दिग्दर्शकीय चित्रपट बारह नंबर'ची घोषणा केली आहे. या चित्रपटात शीबा चड्ढा, अरुणोदय सिंह, एहसास चन्ना आणि अतुल कुलकर्णी यासारखे कलाकार आहेत. हा सायकोलॉजिकल हॉररपट असणार आहे. दासने चालू वर्षाच्या प्रारंभी 'हॅप्पी पटेल: खतरनाक जासूस' चित्रपटाद्वारे दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पदार्पण केले होते. बारह नंबर चित्रपटासाठी वीर दास पुन्हा सहदिग्दर्शक कवि शास्त्रीसोबत पुन्हा काम करणार आहे. या चित्रपटात वीर दास भूमिकाही साकारणार असून त्याच्यासोबत निहारिका लायरा दत्त, श्रिया पिळगावकर, सुहैल नय्यर, पूजा स्वरुप आणि नवीन कौशिकही दिसून येणार आहेत. या प्रोजेक्टमध्ये सामील असलेले सर्व कलाकार अभिनयनिपुण आहेत. प्रेक्षकांना प्रत्येक क्षण खरा वाटला तरच भयपट प्रेक्षकांना पसंत पडतो. या कलाकारांच्या टीमने कहाणीला मोठे स्वरुप मिळवून दिले असल्याचा दावा वीर दासने केला आहे. एहसासने यापूर्वी अनेक वेबसीरिजमध्ये काम करत स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. हा चित्रपट तिच्यासाठी एकप्रकारे मोठी संधी ठरणार आहे.





# कार्थीचा 'सरदार' लवकरच झळकणार

पीएस मिथ्रन यांच्याकडून दिग्दर्शित 'सरदार २' चित्रपटाच्या प्रदर्शनाचा मुहूर्त अखेर निश्चित झाला आहे. या चित्रपटात कार्थी मुख्य भूमिकेत आहे. हा चित्रपट २०२२ मध्ये प्रदर्शित 'सरदार' चित्रपटाचा सीक्वेल आहे. कार्थीने या चित्रपटाची झलक दाखवत एक व्हिडिओ पोस्ट करत हा १० सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार असल्याचे सांगितले आहे. या व्हिडिओत कार्थी हातात बंदूक घेऊन उभा असल्याचे आणि त्याच्यामागे काही स्फोट होत असल्याचे दिसून येते. या व्हिडिओत कार्थीने चित्रपटातील स्वत:च्या दोन भूमिकांपैकी एक एजंट सरदार म्हणजेच चंद्र बोसच्या रुपात दाखविली आहे.

कार्थी चित्रपटात विजय प्रकाश नावाची युवा भूमिकाही साकारत आहे. कार्थीची तेलगू भाषिक राज्यांमध्ये चांगली फॅन-फॉलोइंग आहे. कार्थीच्या चित्रपटाला विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना यांचा चित्रपट 'रणबाली'शी प्रतिस्पर्धा करावी लागणार आहे. हा चित्रपट ११ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. तर त्यापूर्वी टॉक्सिक हा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याने त्याच्याशीही बॉक्स ऑफिसवर स्पर्धा करावी लागेल.

सरदार २ या चित्रपटाची पटकथा रत्ना कुमार, आशामीरा, अय्यप्पन, विग्नेश मुनियांडी यांनी लिहिली आहे. चित्रपटात कार्थी आणि राजिका विजयन मागील चित्रपटातील भूमिकांमध्ये दिसून येतील. तर एसजे सूर्या, मालविका मोहनन आणि आशिका देखील यात दिसून येणार आहेत.

# उर्वशी रौतेलाला हवा संस्कारी जोडीदार

उर्वशी रौतेला अलिकडेच ओटीटी सीरिज इन्स्पेक्टर अविनाश पार्ट २ मध्ये दिसून आली होती. उर्वशीने आता स्वत:च्या आयुष्याचा जोडीदार कसा असावा यावर मत व्यक्त केले आहे. कुठल्याही नात्यात बाहेरील आकर्षणाहून अधिक कौटुंबिक मूल्यं महत्त्वाची असतात असे तिचे म्हणणे आहे. मला पसंत करणाऱ्या लोकांची कमतरता नाही, परंतु जीवनसाथीच्या स्वरुपात मी चांगले संस्कार असणारा जोडीदार निवडू इच्छिते. याचमुळे मी चित्रपटसृष्टीऐवजी अन्य क्षेत्रात कार्यरत इसमाला जोडीदार बनविण्याच्या मताची असल्याचे उर्वशीने म्हटले आहे. जो माणूस मला जाणून घेईल, ज्याचे माझ्यावर प्रेम जडेल असाच जोडीदार मला हवा आहे. जोडीदार कसा दिसतो हे माझ्यासाठी महत्त्वाचे नाही. म झ्यासाठी कौटुंबिक मूल्यं महत्त्वाची आहेत. अनेक पुरुष कुठल्याही प्रकारचे वचन देण्यास घाबरतात. परंतु ज्यांना चांगले कौटुंबिक संस्कार प्राप्त झाले आहेत, ते जबाबदारी स्वीकारण्यास हयगय करत नसल्याचे उर्वशीने म्हटले आहे.





# 'कल्की २'मधून दीपिकाची एक्झिट

दाक्षिणात्य अभिनेते अमिताभ बच्चन, कमल हसन, दीपिका पादुकोण आणि प्रभास यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'कल्कि एडी: २८९८' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. नाग अश्विन दिग्दर्शित 'कल्की: २८९८ एडी' या चित्रपटाला प्रेक्षकांचाही उत्तम प्रतिसाद मिळाला. लवकरच या चित्रपटाचा सिक्वेल येणार आहे. पण, या सिक्वेलमधून दीपिका पादुकोण हिचा पत्ता कट झाला असून तिच्या जागी बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री आलिया भटची एन्ट्री झाल्याची चर्चा आहे.

सध्या आलिया भट तिच्या आगामी बिग बजेट YRF स्पाय युनिव्हर्स'मधील 'अल्फा' या चित्रपटामुळे तुफान चर्चेत आहे. आलियासोबत शर्वरी वाघदेखील या चित्रपटात ॲक्शन करताना दिसणार आहे. या चित्रपटाच्या ट्रेलरचे कौतुक करताना सुपरस्टार प्रभासने सोशल मीडियावर एक अशी पोस्ट शेअर केली आहे, ज्यावरून आलिया आता प्रभासच्या 'कल्की २' या सायन्स-फिक्शन चित्रपटाचा भाग असणार असल्याचे संकेत मिळत आहेत. प्रभासने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम स्टोरीवर 'अल्फा'चा ट्रेलर शेअर केला. या ट्रेलरचे कौतुक करत त्याने लिहिले, 'अल्फा'चा ट्रेलर अप्रतिम आणि खूपच आश्वासक दिसतोय... आलिया, YRF आणि संपूर्ण टीमला शुभेच्छा. प्रभासच्या या पोस्टवर आलियानेही त्वरित प्रतिक्रिया दिली. तिने ही स्टोरी री- शेअर करत लिहिले, खूप खूप धन्यवाद. यासोबत तिने दिलेला 'सूर्याचा इमोजी' सध्या चाहत्यांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. प्रभास आणि आलियामधील हे बॉण्डिंग पाहून चाहत्यांनी 'कल्की २' मधील तिच्या एन्ट्रीवर शिक्कामोर्तब केले आहे. एका चाहत्याने 'द' वर लिहिले, प्रभासने 'अल्फा'चा ट्रेलर शेअर करणे हीच आलिया 'कल्की २' 'कास्ट' झाल्यावर शिक्कामोर्तब करत आहे. तर दुसऱ्या एका चाहत्याने असा अंदाज लावला की, आलियाने वापरलेला सूर्याचा इमोजी हा 'कल्की'च्या विश्वातील 'कर्ण' या पात्राचा संदर्भ असू शकतो. 'कल्की : २८९८ एडी' या पहिल्या भागात दीपिका मुख्य भूमिकेत होती. मात्र, तिने या प्रोजेक्टच्या सिक्वेलमधून माघार घेतल्याची चर्चा आहे. त्यानंतर या भूमिकेसाठी साई पल्लवीसह अनेक आघाडीच्या अभिनेत्रींच्या नावांची चर्चा रंगली होती. मात्र, आता ही भूमिका थेट आलियाच्या गळ्यात पडणार असल्याचे बोलले जात आहे.